2 9 DEC 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कडाक्याच्या थंडीतही तरुणाईचा जल्लोष

## युवा महोत्सव : १४६ महाविद्यालयांतील १२५० कलाकारांचा सहभाग; लोकसंस्कृतीचे दर्शन

**शिवानंद पाटील**
लोकमत न्यूज नेटवर्क

गडहिंग्लज : झांज-कैताळ, धनगरी ढोल, संबळ, तुणतुणे, लेझीम, तुतारी, बासरी, घुमकं, ताशा, सूरपेटी आदी पारंपरिक वाद्यांच्या गजरात लोकवाद्यवृंदाच्या स्पर्धेत तरुणाईने जल्लोष केला. लोककलेतून भारतीय कला-संस्कृतीचे दर्शन घडविले. वन्समोअर, टाळ्या, शिट्यांच्या जल्लोषात महोत्सवाने परमोच्च बिंदू गाठला.

चिंचेवाडी येथे शिवाजी विद्यापीठ आणि येथील संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ४१ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात सहभागी कलाकारांनी थंडीचीही तमा न बाळगता आपल्या कलांचा आविष्कार घडविला.रंगलेल्या स्पर्धा आणि जल्लोषी युवकांचा माहोल यामुळे संत गजानन शिक्षण समूहाचा परिसर फुलून गेला होता. सकाळच्या सत्रात खुल्या रंगमंचावर पाश्चिमात्य समूहगीत, दुपारी लोकसंगीत वाद्यवृंद, शास्त्रीय नृत्य, तर महोत्सवाचे आकर्षण ठरलेल्या 'लोकनृत्या'ची धूम मध्यरात्रीपर्यंत सुरू होती.

'भारतीय संस्कृती, ग्रामीण जीवन आणि धार्मिक सलोखा' या विषयांवर आधारित टाकाऊ वस्तूंपासून साकारलेल्या कलाकृती लक्षवेधी ठरल्या. समूहगीतांना श्रोत्यांनी टाळ्या वाजवून भरभरून दाद दिली. स्थळचित्रण स्पर्धेतील विद्यार्थी आपल्या कलाकृती रेखाटण्यात मग्न होते.

पाश्चात्य पेहराव आणि पाश्चिमात्य गाण्यांवर तरुणाई थिरकत होती. नऊवारी, सहावारी साड्या नेसलेल्या मुली, सलवार कुर्ता घातलेली मुले, भूमिका आणि कलाप्रकारानुसार वेशभूषा केलेले विद्यार्थी, त्यांना टाळ्या आणि वन्समोअरची मिळणारी दाद. हलगी, ढोल-ताशाबरोबरच इतर वाद्यांसह लोकसंगीत वाद्यवृंदाचे सादरीकरण आणि लोकनृत्य व पाश्चात्य गाण्यांवर विद्यार्थ्यांनी ठेका धरला होता. आपलेच सादरीकरण सर्वोत्कृष्ट ठरावा, यासाठी विद्यार्थ्यांनी आपली कला ताकदीने सादर केली.






संत गजानन शिक्षण समूहामध्ये सुरु असलेल्या युवा महोत्सवात टाकाऊ वस्तूंपासून कलाकारांनी बनविलेल्या विविध कलाकृती. दुसऱ्या छायाचित्रात पाश्चिमात्य समूहगीत सादर करताना विद्यार्थी (मज्जीद किल्लेदार)

### कोरोना नियम पाळून महोत्सव

महोत्सवासाठी लसीकरण पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचीच निवड करण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांचा आरटीपीसीआर चाचणीचा निगेटिव्ह अहवाल घेण्यात आला.

महोत्सवात कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील १४६ महाविद्यालयांचे १२५० कलाकार सहभागी झाले आहेत. त्यामध्ये एकूण ७०० मुली, तर ५५० मुलांचा समावेश आहे.

2 9 DEC 2021
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गेल ऑम्वेट यांचा वारसा पुढे चालवा

## सुरेंद्र जोंधळे यांचे आवाहन : शिवाजी विद्यापीठातील ऑनलाइन कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : गेल ऑम्वेट या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कृतिशील विचारवंत आणि संशोधक होत्या. त्यांचा वैचारिक वारसा पुढे चालविण्याची जबाबदारी नवसंशोधकांनी स्वीकारली पाहिजे. ऑम्वेट यांनी भारतातील जातवास्तवाचा प्रश्न समाजाच्या अग्रभागी आणला. स्त्रीशोषणाविरुद्धच्या सामूहिक लढ्याची सैद्धांतिक मांडणी केली, असे प्रतिपादन डॉ. सुरेंद्र जोंधळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र आणि समाजशास्त्र अधिविभागातर्फे 'गेल ऑम्वेट : विचारविश्व आणि सामाजिक चळवळी' या विषयावरील ऑनलाइन कार्यशाळेत ते बीजभाषक म्हणून बोलत होते. कार्यशाळेचे उदघाटन डॉ. भारत पाटणकर यांच्या मनोगताने झाले. अध्यक्षस्थानी डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. ऑम्वेट यांच्यावर अमेरिकेतील प्रबोधनाच्या चळवळीचा प्रभाव होता त्यामुळेच त्यांना भारतामध्ये संशोधन व कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. त्या सत्तरीच्या दशकापासून शेवटापर्यंत समकालीन प्रश्नांना भिडल्या. या प्रश्नांचे सैद्धांतीकरण केले. भारतीय मार्क्सवादाच्या जडणघडणीमध्ये त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले असल्याचे डॉ. जोंधळे यांनी सांगितले. डॉ. संजय कांबळे संपादित 'डॉ. गेल ऑम्वेट समाजशास्त्रीय आकलन' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. पाटणकर यांच्या हस्ते केले. डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. अविनाश भाले यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.

### चळवळीतील योगदान या विषयावर चर्चासत्र

या कार्यशाळेत ऑम्वेट यांचे लेखनकार्य आणि सामाजिक चळवळीतील योगदान या अनुषंगाने विविध विषयांवर सत्रांचे आयोजन केले होते. 'गेल ऑम्वेट : मानवमुक्तीचा विचार आणि ग्रंथसंपदा' या सत्रामध्ये डॉ. रमेश कांबळे, श्रुती तांबे, विभूती पटेल यांनी मांडणी केली. 'गेल ऑम्वेट संस्था आणि चळवळ' या विषयावर डॉ. संजयकुमार कांबळे आणि संपत देसाई यांनी मांडणी केली. अध्यक्षस्थानी डॉ. प्रकाश पवार होते. डॉ. प्रल्हाद माने, कोमल ओसवाल, अभिजित पाटील, आकाश बामणे, किशोर खिलारे, शरद पाटील, विश्वजित पाटील, दयानंद कांबळे यांनी कार्यशाळेचे नियोजन केले.

महासत्ता एकच आवृत्ती 29 DEC 2021

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गेल ऑम्वेट आंतरराष्ट्रीय किर्तीच्या विचारवंत

## -डॉ. सुरेंद्र जोंधळे यांचे प्रतिपादन

कोल्हापूर,ता.२९(प्रतिनिधी)-

................................

गेल ऑम्वेट या आंतरराष्ट्रीय किर्तीच्या कृतीशील विचारवंत व संशोधक होत्या, त्याचा वैचारिक वारसा पुढे चालविण्याची जबाबदारी नवसंशोधकांनी स्वीकारली पाहिजे. गेल ऑम्वेट यांनी भारतातील जातवास्तवाचा प्रश्न समाजाच्या अग्रभागी आणला त्याचबरोबर स्त्रीशोषणा विरुद्धच्या सामुहिक लढ्याची सैद्धांतीक मांडणी केली, असे प्रतिपादन डॉ.सुरेंद्र जोंधळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र आणि समाजशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या गेल ऑम्वेट: विचारविश्व आणि सामाजिक चळवळी या विषयावरील ऑनलाईन कार्यशाळेत बीजभाषक [illegible] डॉ.भारत पाटणकर यांच्या मनोगताने झाले. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानी डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. उद्घाटनप्रसंगी डॉ. संजय कांबळे संपादित 'डॉ.गेल ऑम्वेट समाजशास्त्रीय आकलन' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. पाटणकर यांच्या हस्ते करण्यात आले.

बीजभाषक डॉ.जोंधळे पुढे म्हणाले, गेल ऑम्वेट यांच्यावर अमेरिकेतील प्रबोधनाच्या चळवळीचा प्रभाव होता त्यामुळेच त्यांना भारतामध्ये संशोधन व कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. त्या सत्तरीच्या दशकापासून शेवटापर्यंत समकालीन प्रश्नांना भिडल्या व या प्रश्नांचे सैद्धांतीकरण केले. भारतीय मार्क्सवादाच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाचे योगदान दिले. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची चिकित्सा करून त्याचा विकास करण्याचे काम केले. गेल ऑम्वेट यांनी केवळ बंधुता नव्हे तर लिंगभावावर [illegible] आग्रह धरला. गेल ऑम्वेट यांनी दलित, आदिवासी, शेतकरी व स्त्रिया यांच्या नव्या सामाजिक चळवळीबाबत मुलभूत संशोधन केले. उद्घाटन प्रसंगी स्वागत व प्रास्ताविक अधिविभाग प्रमुख डॉ.जगन कराडे यांनी केले.

या कार्यशाळेत गेल ऑम्वेट यांचे लेखन कार्य व सामाजिक चळवळीतील योगदान या अनुषंगाने विविध विषयांवर सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. 'गेल ऑम्वेट मानवमुक्तीचा विचार आणि ग्रंथ संपदा' या सत्रामध्ये डॉ. रमेश कांबळे, श्रुती तांबे व विभूती पटेल यांनी माडणी केली. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ.जगन कराडे होते. तर 'गेल ऑम्वेट संस्था आणि चळवळ' याविषयावर डॉ. संजयकुमार कांबळे व कॉ. संपत देसाई यांनी मांडणी केली. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रकाश पवार होते. कार्यशाळेच्या नियोजनात डॉ.प्रल्हाद माने, कोमल ओसवाल, अभिजित पाटील, आकाश बामणे, डॉ.किशोर खिलारे, शरद पाटील, विश्वजित [illegible]

29 DEC 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालये, विद्यापीठांतून अध्यापकांना संवर्गनिहाय आरक्षण

## विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत विधेयक एकमताने मंजूर

**मुंबई (पुढारी वृत्तसेवा) : केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्यातील शैक्षणिक संस्थांतील महाविद्यालये, विद्यापीठांतून आता अध्यापकपदांना संवर्गनिहाय आरक्षण लागू होणार आहे. याबाबतचे विधेयक मंगळवारी सामान्य प्रशासन राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत मांडले. यानंतर सभागृहात हे विधेयक एकमताने मंजूर करण्यात आले. त्यानंतर विधान परिषदेतही विधेयकाला मंजुरी देण्यात आली.**



विधिमंडळातून

विधान परिषदेत उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी हे विधेयक मांडले होते. सध्या राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील वरिष्ठ महाविद्यालय व विद्यापीठस्तरावर अध्यापकीयपदांना विषयनिहाय आरक्षण लावण्याचे धोरण अस्तित्वात आहे. मात्र, विषयनिहाय आरक्षणामध्ये मागासवर्गीयांना अध्यापकीय पदांमध्ये त्यांच्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार पुरेसे प्रतिनिधित्व मिळत नसल्याचे समोर आले होते. यावर मागासवर्गीय संघटनांनी शिक्षकीय पदांना विषयनिहायऐवजी संवर्गनिहाय आरक्षण धोरण लागू करण्याची मागणी लावून धरली होती.

### अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना धोरण लागू नाही : भरणे

विधेयकाबाबत बोलताना मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, प्रस्तावित धोरण अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था व राज्याद्वारे अधिसूचनेद्वारे जाहीर करावयाच्या विशेषीकृत अथवा संशोधन संस्थांना लागू राहणार नाही.

त्यावरून केंद्र शासनाने एक उच्चस्तरीय समिती नेमली होती. त्यात मागासवर्गीय उमेदवारांवर अन्याय होतो हे स्पष्ट झाले. अध्यापकीय पदांना संवर्गनिहाय आरक्षण लागू करण्याची शिफारस या समितीने केली होती. त्यानुसार केंद्र शासनाने ९ जुलै २०२१ च्या अधिनियमानुसार केंद्रीय शैक्षणिक संस्थांमधील अध्यापकीय पदांना संवर्गनिहाय आरक्षण धोरण लागू केले. त्याच धर्तीवर राज्यातील शैक्षणिक संस्थांतील अध्यापक पदांना संवर्गनिहाय आरक्षण लागू करण्याची मागणी होत होती.

2 9 DEC 2021 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गेल ऑम्वेट कृतिशील विचारवंत

## डॉ. सुरेंद्र जोंधळे यांचे प्रतिपादन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

गेल ऑम्वेट आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कृतिशील विचारवंत व संशोधक होत्या. त्यांचा वैचारिक वारसा पुढे चालविण्याची जबाबदारी नवसंशोधकांनी स्वीकारली पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. सुरेंद्र जोंधळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र आणि समाजशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'गेल ऑम्वेट : विचारविश्व आणि सामाजिक चळवळी' विषयावरील ऑनलाईन कार्यशाळेत त्या बोलत होते. कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. भारत पाटणकर यांच्या मनोगताने झाले. अध्यक्षस्थानी डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. उद्घाटनप्रसंगी डॉ. संजय कांबळे संपादित 'डॉ. गेल ऑम्वेट समाजशास्त्रीय आकलन' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. भारत पाटणकर यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. जोंधळे म्हणाले, गेल ऑम्वेट यांच्यावर अमेरिकेतील प्रबोधनाच्या चळवळीचा प्रभाव होता. त्यामुळेच त्यांना भारतामध्ये संशोधन व कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. भारतीय मार्क्सवादाच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाचे योगदान दिले.

प्रास्ताविक अधिविभागप्रमुख डॉ. जगन कराडे यांनी केले. अविनाश भाले यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. 'गेल ऑम्वेट मानवमुक्तीचा विचार आणि ग्रंथसंपदा' सत्रामध्ये डॉ. रमेश कांबळे, श्रुती तांबे, विभूती पटेल यांनी माडणी केली. अध्यक्षस्थानी डॉ. जगन कराडे होते. 'गेल ऑम्वेट संस्था आणि चळवळ' या विषयावर डॉ. संजयकुमार कांबळे व कॉ. संपत देसाई यांनी मांडणी केली. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रकाश पवार होते. या कार्यशाळेच्या नियोजनामध्ये डॉ. प्रल्हाद माने, कोमल ओसवाल, अभिजित पाटील, आकाश बामणे, डॉ. किशोर खिलारे, शरद पाटील, विश्वजित पाटील, दयानंद कांबळे उपस्थित होते.

2 9 DEC 2021 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गाण्यांवर तरुणाई थिरकली

## युवा महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी शिट्ट्या... टाळ्या... अन् वन्स मोअर



महागाव : वाद्यवादन कलाविष्काराचे सादरीकरण करताना कलाकार.

महागाव : प्रतिनिधी

तरुणाईच्या विविध कलाविष्काराने संत गजाननचा कॉलेज कॅम्पस फुलला. विविध कलाप्रकारांना मिळालेल्या शिट्ट्या, टाळ्या अन् वन्स मोअरची दाद, तर हलगी, ढोल ताशाबरोबरच इतर वाद्यांचे सादरीकरण, लोकनृत्य व पाश्चात्त्य गाण्यावर विद्यार्थ्यांनी धरलेला ठेका, याने सगळ्यांनाच वेड लावले होते. निमित्त होते महागाव (ता. गडहिंग्लज) येथे शिवाजी विद्यापीठ आयोजित मध्यवर्ती युवा महोत्सवाचे.

येथील संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित युवा महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांच्या पाश्चिमात्य समूहगीत, लोकसंगीत वाद्यवृंद, गायन, लोक व शास्त्रीय नृत्य, वाद्यवादन, मातीकाम, रंगकाम, भित्तीचित्र निर्मिती, सांघिक रचनाकृती, स्थळचित्रे या कलाप्रकाराच्या सादरीकरणातून महोत्सव दिवस गाजवला.

इतरांपेक्षा आपले सादरीकरण सर्वोत्कृष्ट असावे यासाठी सर्वच विद्यार्थ्यांनी जोमात आपली कला सादर केली. रात्री उशिरापर्यंत विविध कलागुणांचे सादरीकरण सुरू होते.

### आता हुरहुर अन् उत्सुकता निकालाची

विद्यापीठाच्या ४१ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचा समारोप उद्या (दि. २९) रोजी विविध स्पर्धांचा निकाल अन् बक्षिसाच्या घोषणेने होणार असल्याने कोणते महाविद्यालय सरस ठरणार, कोणता कलाप्रकार बाजी मारणार, याची उत्सुकता स्पर्धकांना लागली आहे.